केजरीवालांमुळे मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानमध्ये कोणाला मिळणार झटका; सर्वेक्षणातील मतमतांतरे

लोकांच्या मते, आप भाजपाची 'बी टीम'

दिल्ली, वृत्तसंस्था. दिल्ली अध्यादेशाबाबत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारविरोधात सातत्याने वक्तव्य करीत आहेत. दरम्यान, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात काँग्रेसने दिल्ली अध्यादेशाला विरोध केल्याच्या वृत्तानंतर, 2024 च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी बंगळुरू येथे विरोधी पक्षांच्या बैठकीला उपस्थित राहण्याची घोषणा केली. काँग्रेसने दिल्ली अध्यादेशाला पाठिंबा जाहीर करण्यापूर्वी आम आदमी पक्षाच्या विरोधी पक्षांच्या बैठकीत केजरीवाल यांच्या सहभागावर शंका निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर सी व्होटरने एक सर्वेक्षण केले आहे. या अखिल भारतीय सर्वेक्षणात जनतेला एक प्रश्न विचारण्यात आला होता की, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानमध्ये आम आदमी पक्षाने निवडणूक लढवल्याने कोणाचे नुकसान होणार आहे?

काँग्रेसचे नुकसान होईल का?

सी व्होटरच्या अखिल भारतीय सर्वेक्षणात लोकांना प्रश्न विचारण्यात आला होता की, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानमध्ये आम आदमी पार्टीच्या निवडणूक लढतीमुळे कोणाचे नुकसान होईल? याला उत्तर देताना 41 टक्के लोकांचे मत आहे की, आपच्या या निर्णयामुळे काँग्रेसचे नुकसान होईल. त्याचवेळी, आम आदमी पक्षाने या राज्यांमध्ये निवडणूक लढवल्यास भाजपाचे नुकसान होईल, असे या सर्वेक्षणात सहभागी 22 टक्के लोकांचे मत आहे. भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांचे नुकसान होईल, असे मत सर्वेक्षणात 22 टक्के लोक आहेत.

भाजपाच्या सहकार्याने काम केल्याचा आरोप

केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने गुजरात विधानसभा निवडणुकीदरम्यान सर्व जागांवर आपले उमेदवार उभे करण्याची घोषणा केली, तेव्हा भाजपाच्या सहकार्याने काम केल्याचा आरोप करण्यात आला. काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वापासून ते गुजरातच्या पक्ष नेत्यांनी केजरीवाल यांचे हे कृत्य गुजरातमध्ये भाजपाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. त्याचवेळी, आता आम आदमी पार्टी मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये निवडणुकीसाठी सज्ज झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून केजरीवाल सातत्याने या राज्यांना भेटी देत आहेत. दरम्यान, सी व्होटरच्या सर्वेक्षणात लोकांनी धक्कादायक मत व्यक्त केले आहे.

विरोधी बैठकीला हजेरी

आश्चर्याची गोष्ट म्हणजे 15 टक्के लोकांचा असा विश्वास आहे की, त्यांना कोणाचे नुकसान होईल हे माहीत नाही. तसे, सर्वेक्षणाचे आकडे बरोबर की चुकीचे, हे निवडणुकीनंतरच ठरणार आहे. या सगळ्यांमध्ये केजरीवाल यांनी विरोधी पक्षांच्या बैठकीला हजेरी लावली, हेच या निवडणुकीतून माघार घेण्याचे कारण असू शकते.

मोदी हल्लाबोल... विरोधकांचा एकच अजेंडा

'कुटुंब वाचवा, भ्रष्टाचार वाढवा'

दिल्ली, वृत्तसंस्था. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पोर्ट ब्लेअरमधील वीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी विरोधी पक्षांवर भ्रष्टाचार आणि कुटुंबवादाचा आरोप केला. विरोधकांची एकच विचारधारा आहे. 'कुटुंब वाचवा, कुटुंबासाठी भ्रष्टाचार वाढवा' असा अजेंडा असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, काही पक्षांच्या स्वार्थी राजकारणामुळे भारतातील विकासाची व्याप्ती देशाच्या दूरवरच्या भागात पोहोचू शकली नाही. हे पक्ष त्या कामांना प्राधान्य द्यायचे, ज्यात स्वतःचे आणि कुटुंबाचे भले आहे. त्याचा परिणाम असा झाला की, आदिवासी पाडे आणि बेटावरील जनता विकासापासून वंचित राहिली. सध्याचे सरकार आणि मागील सरकारच्या नऊ वर्षांची तुलनाही त्यांनी केली. ते म्हणाले की, गेल्या नऊ वर्षांत आम्ही जुन्या सरकारांच्या चुका सुधारल्या नाहीत, तर लोकांना नवीन सुविधा आणि मार्गही दिले आहेत.

भारतीयांच्या क्षमतेवर अन्याय

विरोधकांवर हल्लाबोल करताना ते म्हणाले की, स्वातंत्र्याच्या 75 वर्षांत आपला भारत कुठेही पोहोचू शकला असता. आम्हा भारतीयांच्या क्षमतेत कधीच कमी पडली नाही, पण भ्रष्ट आणि घराणेशाही करणाऱ्या पक्षांनी सर्वसामान्य भारतीयांच्या या क्षमतेवर अन्याय केला आहे. 2024 साठी देशातील जनतेने आमचे सरकार परत आणण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत भारताच्या दुर्दशेला जबाबदार असलेले काही लोक आपली दुकाने उघडून बसले असल्याचेही ते म्हणाले.

'सबका साथ, सबका विकास'चे मॉडेल

भारतात विकासाचे नवे मॉडेल विकसित झाले आहे. 'सबका साथ, सबका विकास'चे हे मॉडेल आहे. ते पुढे म्हणाले की, मागील सरकारच्या नऊ वर्षांत अंदमान आणि निकोबार बेटांना सुमारे 23,000 कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले होते. आमच्या सरकारच्या काळात 9 वर्षांत अंदमान निकोबारच्या विकासासाठी सुमारे 48 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प देण्यात आला आहे. त्याचवेळी मागील सरकारमध्ये अंदमान-निकोबारमधील सुमारे 28 हजार घरांना पाण्याची जोडणी देण्यात आली होती. आमच्या सरकारमध्ये येथील सुमारे 50 हजार घरांना पाण्याची जोडणी देण्यात आली आहे.

विरोधी पक्ष नेत्यांच्या सेवेसाठी नेमले 'आयएएस' अधिकारी

कुमारस्वामींचा काँग्रेसवर गंभीर आरोप

बंगळुरू, वृत्तसंस्था. भाजपा विरोधी बैठकीत सहभागी झालेल्या विरोधी पक्ष नेत्यांच्या सेवेसाठी काँग्रेस सरकारने राज्यातील 30 आयएएस अधिकारी तैनात केले आहेत, असा गंभीर आरोप राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचे नेते कुमारस्वामी यांनी केला आहे. राज्य सरकारने आयएएस मजदुरी नीती अशी योजना सुरू केली आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. कुमारस्वामी म्हणाले की, कर्नाटकमधील आयएएस अधिकारी हे राज्याच्या क्षमतेचे आणि कार्यक्षमतेचे प्रतीक आहेत. या अधिकाऱ्यांना राजकारण्यांची सेवा करण्यासाठी द्वारपाल म्हणून नियुक्त करणे हे अखिल भारतीय सेवा (आचार) नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे. आयएएस अधिकारी राज्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. या अधिकाऱ्यांना राजकारण्यांच्या सेवेसाठी

अधिकाऱ्यांची नावे उघड केली

एका ट्विटमध्ये कुमारस्वामी यांनी नेत्यांच्या मेजवानीसाठी नियुक्त केलेल्या आयएएस अधिकाऱ्यांच्या नावांची यादी शेअर केली. आघाडीकरून सत्ता मिळवण्याच्या लालसेपोटी काँग्रेसने कर्नाटकचा स्वाभिमान, वारसा आणि स्वाभिमानावर अंत्यसंस्कार केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काँग्रेसच्या कर्नाटक युनिटने आघाडीच्या नेत्यांची सेवा करण्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करून चूक केली आहे. शब्द आणि कृतीत फरक नसणे हेच त्याला म्हणायचे आहे का?, असा सवालही त्यांनी केला आहे.

'गेटकीपर' म्हणून तैनात करणे हे सत्ताधारी पक्षाचा उद्दामपणा दर्शवते. मला आश्चर्य वाटले की, या अधिकाऱ्याने आपला स्वाभिमान आणि प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल हे माहीत असताना हे काम करायला तयार केले. असा वादग्रस्त आदेश देणारे मुख्य सचिव जनतेला उत्तरदायी असल्याचे ते म्हणाले.

स्तुतिसुमने ● उमा भारतींनी केले ज्योतिरादित्यांचे कौतुक

काँग्रेसने गमावला अजिंक्य 'हिरा'

भोपाळ, वृत्तसंस्था. मध्य प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री उमा भारती यांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे वर्णन 'अजिंक्य 'हिरा' असे केले आहे. ज्यांच्यामुळे गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे सरकार स्थापन झाले तो हिरा काँग्रेसने गमावल्याचेही त्या म्हणाल्या. काँग्रेस सोडून शिंदे भाजपामध्ये दाखल झाले आणि आता ते मोदी सरकारमध्ये मंत्री आहेत. उमा भारती यांनी सांगितले की, शिंदे एक 'हिरा' आहे ज्यांना काँग्रेसने गमावले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्यामुळे काँग्रेसचे सरकार स्थापन झाले, त्यांच्यामुळेच ते सरकार पडले आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेसकडे आता पूर्ण बहुमत देऊ शकेल असा नेता नाही, असा दावाही त्यांनी केला.

पक्ष व कार्यकर्ता महत्त्वाचा

भारतीय जनता पक्षाच्या संदर्भात त्या म्हणाल्या की, आजच्या काळात पक्षात कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही चेहरा महत्त्वाचा नसून, कार्यकर्ता आणि पक्षाचा झेंडा सर्वांत महत्त्वाचा आहे. कार्यकर्त्यांना आणि पक्षाचा झेंडा पुढे ठेवूनच निवडणुका लढवल्या जातात. आजच्या काळात मोदींची राजकीय उंची खूप मोठी आहे. त्यांच्या राजकीय उंचीपुढे विरोधी पक्षांचे नेते खूप मागे असल्याची टीकाही त्यांनी केली.

शिवराज मंत्री करणार 40 कोटींचा विमान प्रवास

निवडणुकीच्या वर्षात मध्य प्रदेशातील शिवराज सिंह चौहान सरकार अत्यंत गंभीर आहे. राज्यातील प्रत्येक लहान-मोठ्या प्रकरणाची गंभीर दखल घेतली जात आहे. सरकारच्या योजना जनतेपर्यंत नेण्यात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सरकारने 12 खासगी विमानांचे कंत्राट दिले आहे. यामुळे मुख्यमंत्री शिवराज यांच्यासह मंत्र्यांना विमानांचा वापर करून जनतेपर्यंत पोहोचता येईल. आचारसंहिता लागू होईपर्यंत ही विमाने वापरता येतील. 13 वर्षात राज्य सरकारने विमान कंपन्यांना 113 कोटी 45 लाख 70 हजार 537 रुपये भाडे दिले आहे. 2023-24 या आर्थिक वर्षासाठी शिवराज मंत्रिमंडळाने बजेटमध्ये खासगी विमानांसाठी 30 कोटी रुपयांची तरतूद केली होती, मात्र आता ती वाढवून 40 कोटी करण्यात आली आहे. या बजेटमधून विमान कंपन्यांना विमान प्रवासासाठी पैसे दिले जातील. या विमानांचा वापर मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य करतील. या विमानांचा वापर करून मंत्री जनतेपर्यंत पोहोचतील आणि जनतेला सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती देतील.

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हेन्सी अँन्ड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (स्वैच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)

नेपच्यून व्हेंचर्स अँन्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधून घेण्याकरिता

संबंधित तपशील	
१. कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	नेपच्यून व्हेंचर्स अँन्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड
२. कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक	१५.०१.२००९
३. प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे	आरओसी- मुंबई
४. कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर/लिमिटेड लाएबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर	U45202MH2009PTC189590
५. कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास)	**नोंदणीकृत कार्यालय :** ४ था मजला, इस्टर्न बिझनेस डिस्ट्रीक, मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल बी एस रोड, भांडुप (प.), मुंबई, मुंबई शहर, महा.- ४०००७८.
६. कॉर्पोरेट ऋणकोंच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	दि. १७.०७.२०२३ (दि. १८.०७.२०२३ रोजी आदेशाची प्रत अपलोड)
७. परिसमापन ठराव प्रक्रिया समाप्तीची अंदाजित दिनांक	दि. १३.०१.२०२४
८. अंतरिम ठराव अधिकारी म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव व नोंदणीकरण क्रमांक :-	नाव : श्री. संदीप महाजन नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA-001/IP-P00991/2017-2018/11631
९. बोर्डावर नोंदणीकृत म्हणून इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचा पत्ता व ई-मेल	पत्ता : सी२/२८८, जनकपुरी, न्यू दिल्ली- ११००५८. ई-मेल आयडी : sandeep8mahajan@gmail.com
१०. अंतरिम ठराव अधिकाऱ्यासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल	पत्ता : फ्लॅट क्र. ४०९, ४ था मजला, अन्सल भवन, १६, के जी मार्ग, कॅनॉट पॅलेस, न्यू दिल्ली- ११०००१. ई-मेल आयडी : neptuneventures.ibc@gmail.com
११. दावे सादरीकरणाची अंतिम तारीख	दि. ३१.०७.२०२३
१२. अंतरिम ठराव अधिकाऱ्यांद्वारे निश्चित अनुच्छेद २१ च्या उप-अनुच्छेद (६ए) च्या कलम बी अंतर्गत धनकोंचा वर्ग काही असल्यास	लागू नाही.
१३. वर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नियुक्त परिसमापन अधिकाऱ्यांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	लागू नाही
१४. ए) संबंधित फॉर्म व बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील जेथे उपलब्ध आहे	ए)) संबंधित फॉर्मची वेब लिंक : http://ibbi.gov.in.downloadform.html बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील : लागू नाही

*एनए – लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने **नेपच्यून व्हेंचर्स अँन्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या** कॉर्पोरेट परिसमापन ठराव प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश **दि. १७.०७.२०२३** रोजी दिला आहे.

नेपच्यून व्हेंचर्स अँन्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की त्यांनी दि. ३१.०७.२०२३ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत वरील अ. क्र. १० मध्ये विहित पत्त्यावर अंतरिम ठराव अधिकाऱ्यांकडे त्यांचे दावे सादर करावेत.

वित्तीय धनकोनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह व्यक्तिगत स्वरूपात टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.

वरील विवरण क्र. १२ अंतर्गत सूचिबद्ध वर्गातील वित्तीय धनकोनी फॉर्म सीए मधील वर्गाच्या(विशिष्ट वर्ग) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी विवरण क्र. १३ मध्ये विवरणीत सूचिबद्ध तीन परिसमापन अधिकाऱ्यांतून एकाची निवड करावी. लागू नाही

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

सही/–
श्री. संदीप महाजन
अंतरिम ठराव अधिकारी
नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA-001/IP-P00991/2017-2018/11631
एएफए वैधता : १९.१२.२०२३ पर्यंत

तारीख : १९.०७.२०२३ ४०९, अन्सल भवन, १६, के जी मार्ग, (कॅनॉट पॅलेस), न्यू दिल्ली- ११०००१.
ठिकाण : दिल्ली ई-मेल : neptuneventures.ibc@gmail.com

ओमान चांडी यांचे निधन

तिरुवनंतपूरम. केरळचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते ओमान चांडी यांचे मंगळवारी निधन झाले. राहुल गांधींसह ते भारत जोडो यात्रेतही सहभागी झाले होते. ओमान चांडी यांच्या नातेवाईकांनी त्यांचे निधन झाल्याची माहिती दिली. काँग्रेसचे दिग्गज नेते म्हणून ओळखले जाणारे ओमान चांडी हे 79 वर्षांचे होते. ओमान चांडी यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून बंगळुरूत उपचार सुरू होते. त्यांच्या मुलाने सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली. 2004 ते 2006 आणि 2011 ते 2016 या कालावधीत त्यांनी केरळचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. ओमान चांडी हे मागील बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. 2019 पासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांना घशाचा आजारही जडला होता. उपचारांसाठी त्यांना जर्मनीतही नेण्यात आले होते. पहाटे पाच वाजताच्या सुमारास सोशल मीडिया पोस्टद्वारे चांडी यांच्या मुलाने त्यांच्या निधनाची माहिती दिली आहे.

रावत यांच्यासह नेत्यांच्या आवाजाचे नमुने द्या

डेहराडून, वृत्तसंस्था. 2016 च्या 'स्टिंग ऑपरेशन' प्रकरणात विशेष सीबीआय न्यायालयाने उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांच्यासह 4 नेत्यांना त्यांच्या आवाजाचे नमुने देण्याचे आदेश दिले आहेत. विशेष न्यायाधीश, सीबीआय धर्मेंद्र अधिकारी यांनी ज्येष्ठ काँग्रेस नेते रावत, राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री हरकसिंग रावत, काँग्रेसचे द्वारहतचे आमदार मदन

स्टिंग ऑपरेशनप्रकरणी सीबीआय कोर्टाचा आदेश

बिश्त आणि स्टिंगिंग पत्रकार आणि आता खानपूरचे अपक्ष आमदार उमेश शर्मा यांना त्यांच्या आवाजाचे नमुने देण्याचे आदेश दिले आहेत. आवाजाचे नमुने केव्हा आणि कुठे घेतले जातील याबाबत सीबीआय या नेत्यांना स्वतंत्र नोटीस बजावणार आहे. तत्पूर्वी, 15 जुलै रोजी या खटल्याच्या सुनावणीदरम्यान उमेश शर्मा वगळता सर्व नेत्यांच्या वकिलांनी सीबीआयच्या आवाजाच्या नमुन्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. कारण या प्रकरणाशी संबंधित याचिका उत्तराखंड उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, ज्यावर 27 जुलैला सुनावणी होणार आहे. 2016 मध्ये काँग्रेसच्या 10 आमदारांनी हरीश रावत यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरोधात बंड करून भाजपाशी हातमिळवणी केल्यानंतर हे स्टिंग ऑपरेशन समोर आले होते. या स्टिंगमध्ये ऐकलेले आवाज जुळण्यासाठी सीबीआयने न्यायालयाकडे परवानगी मागितली होती.

महाकाल यात्रेतील भक्तांवर थुंकणाऱ्या तिघांना अटक

उज्जैन, वृत्तसंस्था. येथे हिंदूंच्या धार्मिक यात्रेच्या वेळी भक्तांवर थुंकण्याची घटना घडली आहे. या प्रकरणी 3 जणांना अटक करण्यात आली. हे तिघेही अल्पवयीन असल्याने त्यांची ओळख उघड करण्यात आलेली नाही. या प्रकरणी हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी पोलिसांकडे दोषींवर कारवाई करण्यासह ते ज्या घरात रहात आहेत, त्या घराची कागदपत्रे तपासण्याची मागणी केली आहे.

यूट्युबरवर आयकर विभागाचे छापे

बरेली, वृत्तसंस्था. उत्तर प्रदेशातल्या बरेली येथील एका युट्युबरच्या घरावर प्राप्तीकर विभागाने छापा टाकला आहे. त्याच्या घरातून 24 लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र या यूट्यूबरच्या कुटुंबीयांनी तस्लिमवर करण्यात आलेले सर्व आरोप चुकीचे असल्याचे म्हटले आहे. तस्लिमचा भाऊ फिरोज याने भावाविरोधात झालेल्या कारवाईचा निषेध केला आहे. एका नियोजित कटानुसार माझ्या भावाला अडकवण्यात येत आहे, असे सांगतानाच फिरोजने तस्लिमवरील सर्व आरोप खोटे असल्याचे म्हटले आहे.

नगर पंचायत कुही ता. कुही, जि. नागपूर -441202

E-mail Id: nagarpanchayatkuhi@gmail.com दुरध्वनी क्रमांक 07100& 222280

क्रमांक/नपंकु/स्व.वि./2127/2023-24 दिनांक:18/7/2023

शुद्धीपत्रक

मुख्याधिकारी नगर पंचायत कुही, जि-नागपूर यांचे वतीने घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी कचरा संकलन करणे, सार्वजनिक रस्त्यावर झाडू लावणे व कचरा वाहतूक करणे, नाली साफ सफाई करणे यासह घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणेच्या कामाकरीता रु. 90,25, 387 /- रक्कमेची ई- निविदा सूचना दैनिक नवराष्ट्र दि. 18/07/2023 चे अंकामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु सदर वृत्तपत्रात प्रसिद्ध ई - निविदा सूचनेमध्ये सदर कामाची किमत चुकीने रु. 10,25,387 /- टाकण्यात आली असून ती रु.90,25,387/- (अक्षरी नव्वद लाख पंचवीस हजार तीनशे सत्याऐंशी रुपये) आहे. तसेच पिन कोड क्रमांक 441101 नसून 441202 आहे, याची नोंद घ्यावी.

स्वा/
मुख्याधिकारी,
नगरपंचायत, कुही.

दळणवळण मंत्रालय, टपाल विभाग, नागरी विंग

प्रेस नोटिस आमंत्रण टक्केवारी दर ई-निविदा

खालील कामासाठी भारताच्या राष्ट्रपती यांच्या वतीने कार्यकारी अभियंता (सी), पोस्टल नागरी विभाग, नागपूर, ऑनलाइन टक्केवारी दर (सीपीडब्ल्यूडी-7) ई-निविदा आमंत्रित करीत आहेत.

एन.आय.टी. क्रमांक: 10/ईईपी/एनजीपी/2023-24

कामाचे स्वरूप: नांदेड विभाग, छत्रपती संभाजीनगर क्षेत्र अंतर्गत नायगाव पीओचे बांधकाम.

अंदाजे खर्च: रु.46,51,955/-

इसारा रक्कम: रु. 93,039/-

पूर्ण होण्याचा कालावधी :- 4 महिने

बोली सादर करण्याची शेवटची वेळ आणि तारीख : 31.07.2023 रोजी 15.00 वाजेपर्यंत

बिड फॉर्म आणि इतर तपशील https://dopcivil.euniwizarde.com या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

सध्याची मानसिक ताणतणाव वाढविणारी जीवनशैली, लहानपणी नकळत लागलेल्या चुकीच्या सवयी, शीघ्रपतनमुळे होणाऱ्या कमजोरीसाठी, नसांमधील ढिलेपणा यामुळे वैवाहीक व दैनंदिन जीवनात असंतुष्टता येते. या सर्वांवर जडीबुटींनी बनवलेले सप्त **धातू** टॉनिक **आयुरेक्स एस** कॅप्सुल आणि तेल. जे पुरुषांच्या शिथिल नसांना पोषण देऊन त्यांना मजबूत करतात. आता फक्त २५* दिवसांचा आदर्श कोर्स करा आणि आपल्या वैवाहिक जीवनात अनुभवा एक नवा जोश व जबरदस्त स्टॅमिना **जास्त वेळ.** १००% नैसर्गिक ह्याचा कोणताही साईड ईफेक्ट नाही.

वैद्यकीय सल्ल्यासाठी संपर्क करा : 8097047259 7715940994

आयुरेक्स एस कॅप्सुल

आयुरेक्स एस कॅप्सुल आणि तेल सर्व मेडीकल स्टोर्स मध्ये उपलब्ध.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर

ई-निविदा सुचना क्रमांक 95 सन 2023-24

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, बांधकाम संकुल, सिव्हील लाईन्स, नागपूर (दुरध्वनी क्र. 0712-2560856) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील (क्र. 1 ते 09) कामाकरीता ब-1 नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवत आहेत. निविदा कागदपत्र संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in व www.mahapwd.gov.in "Pay PWD Online" येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

Sr. No.	Name of Work	Estt. No.	Tender Amount
1	Estt.No.364/NGP/2023-24:- Providing four Nos. of Labour/Mazdoor for Nine Months period for the year of 2023-2024 on contract basis for carrying out cleaning work and maintaining Electrical Equipment's / Accessories in Govt. Non Residential Building under Electrical Sub Division No.2 Nagpur. Distt. Nagpur.	576576/-	5800/-
2	Estt.No.365/NGP/2023-24:- Providing four Nos. of Labour/Mazdoor for Nine Months period for the year of 2023-2024 on contract basis for carrying out cleaning work and maintaining Electrical Equipment's / Accessories in Govt. Non Residential Building under Electrical Sub Division No.1 Nagpur. Distt. Nagpur.	576576/-	5800/-
3	Estt.No.366/NGP/2023-24:- Providing four Nos. of Labour/Mazdoor for Nine Months period for the year of 2023-2024 on contract basis for carrying out cleaning work and maintaining Electrical Equipment's /Accessories in Govt. Non Residential Building under Electrical MCAH Sub Division Nagpur. Distt. Nagpur..	576576/-	5800/-
4	Estt.No.397/GND/23-24:- Providing 62.5 KVA DG set to Rural Hospital at Saundad, Tah.Sadak Arjuni Dist.Gondia.	1075069/-	10800/-
5	Estt.No. 526/GND/23-24:-Providing Renovation to E.I & DG Set to Rural Hospital At Salekasa, Tah-Salekasa, Dist- Gondia.	1544164/-	15500/-
6	Estt.No.402/ GND/23-24:- Providing Renovation to E.I. & DG set to Rural Hospital at Amgaon, Tah.Amgaon Dist.Gondia.	2035595/-	20400/-
7	Estt.No.403/GND/23-24:- Providing Renovation to E.I. & DG set to Rural Hospital at Rajegaon, Tah. Rajegaon Dist.Gondia.	2035595/-	20400/-
8	Estt.No.401/GND/23-24:- Providing Renovation to E.I. & DG set to Rural Hospital at Sadak Arjuni, Tah.Sadak Arjuni Dist.Gondia.	2035595/-	20400/-
9	Estt.No.524/BND/23-24:-Providing 125 KVA D.G. Set for DPDC Hall in the Premises of Collector Office Bhandara	1516904/-	15200/-

1) निविदा उपलब्ध कालावधि अ.क्र.:- 1 ते 3 दि. 19.7.2023 ते 02.08.2023 निविदा सादर करण्याचा दि.03.08.2023
2) निविदा उपलब्ध कालावधी अ.क्र.:- 4 ते 9 दि.19.7.2023 ते 02.08.2023 निविदा उघडण्याचा दि.03.08.2023
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1. www.mahatenders.com (NIC portal) व www.mahapwd.gov.in "Pay PWD Online" (सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) 2.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर कार्यालयातील सुचना फलक.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बाधकाम (विद्युत) विभाग, नागपूर

DGIPR/2023-24/2175

नगर पंचायत कार्यालय महादुला
ता. कामठी, जि. नागपूर - 441111

ई-मेल:mahadulanagarpanchyat@gmail.com टोल फ्री: - 1800233 3265

जावक क्रमांक: 896 / कर. वि / नपंम / 2023, दिनांक : 18/07 / 2023

जाहीरनामा

याद्वारे नागरिकांना सूचित करण्यात येते कि, नगर पंचायत महादुला मधील मालमत्तांचा वारसान प्रमाणपत्र / मृत्यू प्रमाणपत्र / बक्षिसपत्र / खरेदी खत / आवश्यक अनुषंगिक दस्तावेज आधारे स्वत:च्या नावाने फेरफार करण्याबाबत किवां विक्रीकरण्यासबंधी / मालमत्ता क्षेत्रफळ सुधारणा संबंधी नगर पंचायत महादुला कार्यालय येथे अर्जदारांनी अर्ज केलेले आहेत.

खालील नमूद मालमत्तेवरील वारसांन व त्या व्यतिरिक्त ज्यांना हक्क असेल त्यांनी सदहु मालमत्तेच्या फेरफार / क्षेत्रफळ वाढीसंबंधी कोणताही सुझाव वा आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचा तारखेपासून आवश्यक दस्ताएवजसह लेखी आक्षेप 7 दिवसाच्या आत मुख्याधिकारी यांना स्वत: किवां नगर पंचायत, महादुला येथे आवक जावक कार्यालयात सादर करून पोच घ्यावी, जेने करून आवश्यक वाटल्यास प्रकरणात कागदपत्र आधारे किवां सुनावणी देऊन निर्णय घेता येईल. नमूद मुदतिच्या आत कोणत्याही स्वरूपाचे वारसानाचे वा हक्क असण्याऱ्या व्यक्तीचे लेखी स्वरूपाचे आक्षेप कागतपात्रसहित प्राप्त न झाल्यास वरील नमूद प्रकरणात अर्जानुसार ना-हरकत प्रमाणपत्र /कर आकरणीसाठी फेरफार / क्षेत्रफळ सुधारणा याची न.प.अभिलेखावर नोंद घेण्याचा निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर कुणाचेही आक्षेप ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्र.क्र.	सध्या नगरपंचायत रेकॉर्डवर असलेले नाव	प्लॉट (फुट. चौ)	परिसराचे नाव प्रभाग / .क्र	मालमत्ता क्रमांक	अर्जदाराचे नाव फेरफार) याचे मागविणा नाव	फेरफार करिता सादर केलेले दस्तेवज	मालमत्तेचे त-वर्णनशी
1	2	3	4	5	6	7	8
19	बेनिराम निखाडे व छननुलाल कापसे	1000 चौ. फुट.	आदर्श परिसर महादुला	1425	शेखर वामनराव दखाते	विक्रीपत्र	खाली जागा
20	हरीशचंद दशरथ ढेंगरे	1452 चौ. फुट.	आरामशीन जवळ परिसर महादुला	551/8	चंद्रप्रकाश भैय्यालाल आगासे	विक्रीपत्र	खाली जागा
21	छाया गोपाल ब्राम्हणे	1148 चौ. फुट.	ढेंगरे ले-आऊट परिसर	6898	सौ. सुवर्णा नरेंद्रकुमार ढोक	विक्रीपत्र	खाली जागा
22	सौ. मंजू रवींद चव्हाण	1000 चौ. फुट.	आदर्श परिसर	6885	सौ. राजेश्वरी राजू बिसेन	विक्रीपत्र	खाली जागा
23	मनोहर तुळशीराम कुबडे	1162 चौ. फुट.	धुडस ले-आऊट	1267	शुभम मनोहर कुबडे	विक्रीपत्र	आर सी सी बांधकाम
24	गुलाब दशरथ ढेंगरे	500 चौ.फुट.	जुना गावठाण परिसर	86 / क / 1 व 963	दिलीप गुलाब ढेंगरे व शोभा राऊत	वारसान	आर सी सी बांधकाम
25	सुरेश व राजेश पन्नालाल कंभाले	317 चौ. फुट.	कंभाले टावर	218 G-15	सौ. शितल यशवंत मेश्राम	विक्रीपत्र	आर सी सी बांधकाम
26	राणूबाई दामोधर सोनटक्के	1800 चौ. फुट.	झेंडा चौक परिसर	225	सुरेश दामोधर सोनटक्के	वारसान	आर सी सी बांधकाम
27	बलदेव सरजू शाहू	140 चौ. फुट.	शिवाजी नगर परिसर	241/17	सचिन भगवान सोनवणे	विक्रीपत्र	आर सी सी बांधकाम
28	पार्वताबाई महादेव निंदेकर	800 चौ. फुट.	स्मिता ले. आउट परिसर	270	देवचंद महादेव निंदेकर	वारसान	आर सी सी बांधकाम
29	यशवंत मेश्राम व इतर 07	3000 चौ. फुट.	स्मिता ले-आउट परिसर	894/2	यश राजेश मेश्राम	नोंदणीकृत हक्क सोडल्याचा लेख	खाली जागा
30	नलिनी दुर्योधन घुडस	1950 चौ. फुट.	आदर्श नगर	1563	भाऊराव व अंकुश राऊत	विक्रीपत्र	खाली जागा
31	नामदेव गोविंदराव उमाटे	900 चौ. फुट.	आरामशिन जवळ	958	पुष्पा नामदेव उमाटे	वारसान	आर सी सी बांधकाम
32	श्री. रमेश काशिनाथ थोटे	3000 चौ. फुट.	स्मिता ले. आऊट	4	सौ. उषा रमेश थोटे	बक्षीसपत्र	आर सी सी बांधकाम

मुख्याधिकारी,
नगर पंचायत, महादुला